2018-19



MAH/MUL/ 03051/2012 ISSN :2319 9318

आंतरविद्याशाखीय बहुभाषिक शोध पत्रिका

# विद्यावार्ता™

Jan. To March 2019
Issue-29, Vol-05

Date of Publication
30 Jan. 2019

**Editor**

**Dr. Bapu g. Gholap**

(M.A.Mar.& Pol.Sci.,B.Ed.Ph.D.NET.)

विद्येविना मति गेली, मतीविना नीति गेली
नीतिविना गति गेली, गतिविना वित्त गेले
वित्तविना शूद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले

-महात्मा ज्योतीराव फुले

❖ विद्यावार्ता या आंतरविद्याशाखीय बहूभाषिक त्रैमासिकात व्यक्त झालेल्या मतांशी मालक, प्रकाशक, मुद्रक, संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायक्षेत्र:बीड

"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat**.

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205

Harshwardhan Publication Pvt.Ltd.
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com

All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

Principal
Mahatma Gandhi Arts,
Science & Late
N.P. Commerce College
Armori, Dist. Gadchiroli

19

# प्रा. शंकर सखाराम यांच्या कादंबऱ्यांची वैशिष्ट्य

कु. प्रणिता कचरूजी गेडाम
पीएच. डी. संशोधिका

डॉ. विशाखा वंजारी
पीएच. डी. मार्गदर्शिका, मराठी विभागप्रमुख, संशोधन केंद्र
महात्मा गांधी महाविद्यालय आरमोरी, जि. गडचिरोली

**********

**प्रस्तावना :—**

साठोत्तरी मराठी साहित्यातील विविध साहित्य प्रवाहात मोलाची भर घालण्याचे कार्य अनेक साहित्यिकांनी केले. त्यांच्यातीलच एक प्रतिभासंपन्न साहित्यिक म्हणजे प्रा. शंकर सखाराम होत. जे एक कथाकार, कादंबरीकार, कवी व पत्रकार म्हणून मराठी साहित्यक्षेत्राला परिचित आहेत. त्यांनी आजवर ३२ पुस्तके लिहिलेली असून त्यात कथासंग्रह, कादंबरी, कविता, एकांकिका, व्यक्तिचित्रे, बालकथासंग्रह, बालकविता, ललित गद्य, लोकसाहित्य, आस्वादपर संशोधन, वस्तूकोश, इतिहास अशा विविध साहित्य प्रकारांचा समावेश आहे. त्यांनी केवळ साहित्य प्रकारच नव्हे तर अनेक वर्तमानपत्रांतून व साहित्यविषयक मासिकांतून विविध विषयांवर विपूल लेखन केले आहे. त्यांच्या अनेक साहित्यकृत्यांना अनेक पुरस्कारही प्राप्त झालेले आहेत. ते एक साहित्यिक म्हणून परिचित असण्यासोबतच एक पत्रकार, स्तंभलेखक, चित्रकार म्हणूनही त्यांचा नावलौकिक आहे.

प्रा. शंकर सखाराम यांच्या कादंबरी लेखनाचा विचार करता त्यांच्या 'माया' (१९९७), 'कोसलन' (१९९९), 'एसईझेड' (२००७), 'भूक' (२००८), 'बखर सदाशिव वाशीकरची' (२०१०) यासारख्या कादंबऱ्या प्रकाशित झाल्या आहेत. त्यांनी आपल्या प्रत्यक्ष जीवनात ज्या जीवन जाणीवा अनुभवल्या, भोगल्या त्या जीवनानुभवातून या कादंबऱ्याची भावस्पंदने आकारास आलेली आहेत. या सर्व कादंबऱ्यांत त्यांनी विशेषतः निसर्गाशी तादात्म्य पावून लोकसंस्कृती, ग्रामसंस्कृती व नागरसंस्कृतीचे वास्तववादी बोलके शब्दचित्र रेखाटण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे. स्वानुभवातून साकार झालेल्या त्यांच्या ह्या कादंबऱ्या सर्वसामान्यांच्या आयुष्याची बोलकी शब्दचित्रे असल्याने, त्यांच्या ह्या कादंबऱ्या साहित्य प्रेमींच्या पसंतीत खऱ्या उतरून मराठी साहित्यविश्वात विशेष गाजल्या.

**प्रा. शंकर सखाराम यांच्या कादंबऱ्या :—**

कोणतीही कादंबरी ही केवळ वास्तववादी समाज चित्रणच करीत नाही. तिच्याद्वारे त्यातील भाषा, समाज, रीतिरिवाज आणि सामुहिक स्मृतीचा इतिहासही बोलका केला जातो. तर 'कादंबरीकार आदर्श आणि वास्तव, सिद्धांत आणि व्यवहार या जोड्यांचा आश्रय घेत घेत भूत, भविष्य व वर्तमान यांचा दुवा लक्षात घेत मानवी समूहाच्या व्यथावेदनांचे समष्टी परिचय घडवतो' पंकज परमार यांचे मत लक्षात घेता प्रा. शंकर सखाराम यांची पहिली कादंबरी 'माया' ही अशाच स्वानुभवांतून साकार झाली आहे. तर त्यांची दुसरी कादंबरी 'कोसलन' ही अंधश्रद्ध आगरी लोकांचे जीवन चितारतांना कारखानदारीच्या येण्याने ग्रामसंस्कृती नष्ट होणार असल्याचे संकेत सुचवून जाते. त्यांची 'एसईझेड' ही कादंबरी औद्योगिकीकरणाच्या नावाखाली रियल इस्टेटचा डाव मांडला जात असतांना ग्रामसंस्कृती व कृषि संस्कृतीचे महत्व अधोरेखित करण्याचा आटोकाट प्रयत्न करते. तर त्यांच्या 'भूक' या कादंबरीत जमीन हडपल्या गेलेले भूमिहीन पोटासाठी आटापिटा करतांना आपल्या शोषणाविरूद्ध ब्र ही न काढता जगण्याचे भयाण वास्तव चित्र रेखाटले गेले आहे. तसेच 'बखर सदाशिव वाशीकरची' या कादंबरीत एका मास्तराच्या जीवनाची फरफट, त्याच्या जीवनातील उद्वेग, बाह्य जगाची निष्ठुरता व संमिश्र घटना रेखाटतांना ग्रामसंस्कृती सोडून नागरसंस्कृतीत स्थिरावण्याचा प्रयत्न करणाऱ्या अतिसामान्याची कहाणी चित्रित केलेली आहे.

एकूणच प्रा. शंकर सखाराम यांच्या सर्वच कादंबऱ्यांच्या विषयाची नाळ ही समाजातल्या



Principal
Mahatma Gandhi Arts, Science & Late N. P. Commerce College, Armori, Dist - Gadchiroli
M.G. Arts Science & late N.P. Commerce College ★Armori★